नॅशनल कॅन्सर इन्स्टिटयूट, नागपूर येथे आरोग्य सेवा देणाऱ्या खाजगी संस्थेमध्ये केलेली वैद्यकीय सेवा ही “बंधपत्रित सेवा” म्हणून ग्राहय धरण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्र.एमईडी १०१९/प्र.क्र.२४१/१९/शिक्षण-२,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक:- ०१ ऑगस्ट,२०१९

संदर्भ:- १)संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक संवैशिवसं/नॅकइ/नागपूर/बंधपत्र/सेवा/मान्यता/२०१९/८-अ, दिनांक १८/०७/२०१९

प्रस्तावना:- शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांवर शासनातर्फे मोठया प्रमाणावर खर्च केला जातो. खर्चाच्या तुलनेत विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणारे शुल्क अत्यल्प आहे. सदरचा खर्च हा जनतेमार्फत शासनास कराच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या रक्कमेतून करण्यात येत असल्याने त्याची काहीअंशी परतफेड व्हावी या उद्देशाने शासकीय महाविद्यालयातून वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून शासकीय सेवा करण्याबाबतचे बंधपत्र लिहून घेण्यात येते. अशा उमेदवारांकडून महाराष्ट्र राज्यामध्ये स्थित असलेले भारत सरकार वा भारत सरकारचे उपक्रम, महाराष्ट्र शासन वा महाराष्ट्र शासनाचे उपक्रम/ स्थानिक स्वराज्य संस्था वा त्यांचे उपक्रम आणि संरक्षण दलाचे उपक्रम तसेच राज्याच्या काही नक्षलग्रस्त, दुर्गम व आदिवासी बहुल तालुक्यामध्ये/ जिल्हयामंध्ये कार्यरत अशासकीय संस्थामध्ये (NGOs) येथे केलेली वैद्यकीय सेवा ही “बंधपत्रित सेवा” म्हणून ग्राहय धरण्यात येते.

नॅशनल कॅन्सर इन्स्टिटयूट, नागपूर या खाजगी संस्थेमार्फत कॅन्सरग्रस्तांना रुग्णसेवा पुरविण्याचे काम करण्यात येते. अशा खाजगी संस्थांना प्रोत्साहन व कॅन्सर ग्रस्तांना लवकरात लवकर रुग्णसेवा प्राधान्याने देण्याच्या अनुषंगाने त्या संस्थेमध्ये केलेली वैद्यकीय सेवासुध्दा “बंधपत्रित सेवा” म्हणून ग्राहय धरुन बंधपत्रित सेवांची व्याप्ती वाढविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:- नॅशनल कॅन्सर इन्स्टिटयूट, नागपूर ही संस्था कॅन्सरग्रस्त रुग्णासाठी कार्यरत असल्याने त्या संस्थेस प्रोत्साहन आणि कॅन्सरग्रस्त रुग्णांना आरोग्य सेवा देण्याच्या दृष्टीने या संस्थेअंतर्गत शासकीय/ महापालिका महाविद्यालयातून पदवी/ पदव्युत्तर पदवी/ पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांनी केलेली वैद्यकीय सेवा ही “बंधपत्रित सेवा” म्हणून ग्राहय धरण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. वरील प्रमाणे केलेली वैद्यकीय सेवा ही “बंधपत्रित सेवा” म्हणून ग्राहय धरण्याच्या दृष्टीने संबंधित संस्थेने खालील अटी व शर्ती पूर्ण करणे आवश्यक आहे:-

१. बंधपत्रित उमेदवारांच्या निवासाची व्यवस्था संबंधित संस्थेने विनामूल्य करावी.
२. बंधपत्रित उमेदवारांचे वेतन/ मानधन हे संस्थेने शासनाच्या नियमानुसार अदा करणे आवश्यक राहिल.

३. उक्त संस्थेस सर्व संबंधित शासकीय यंत्रणेकडून आवश्यक त्या मान्यता प्राप्त केलेल्या असणे बंधनकारक राहिल.
४. संबंधित संस्थेस बंधपत्रित उमेदवार उपलब्ध करुन देण्यासाठी शासन/ महानगरपालिकेच्या/ सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील रुग्णालय/ प्राथमिक आरोग्य केंद्र येथे डॉक्टर्सची कमतरता पडणार नाही यांची दक्षता संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय आणि संचालक, आरोग्य सेवा यांनी घेणे आवश्यक राहिल.
५. संबंधित संस्थेने बंधपत्रित उमेदवारांकडून फक्त रुग्ण सेवेशी काम करुन घेणे बंधनकारक राहील.
६. बंधपत्रित उमेदवारांना शासन नियमानुसार रजा व सुट्टया अनुज्ञेय राहतील.

३. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य यांना वरील अटी व शर्तीबाबत राज्य शासनातर्फे उक्त संस्थेशी सामंजस्य करार करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०१९०८०११५३९३४८७१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Surendra Pralhad Chankar

Digitally signed by Surendra Pralhad Chankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=MEDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=da74ced4daa59e5121be348655e71412ea68827bae27cd8d480eb3963ff77726, cn=Surendra Pralhad Chankar
Date: 2019.08.01 18:03:12 +05'30'

(सुरेन्द्र चानकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.राज्यमंत्री(वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, आरोग्य भवन, मुंबई.
संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/ नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
अधिष्ठाता,सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये/बृहन्मुंबई महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालये/ठाणे महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालय (वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयामार्फत)
निवडनस्ती (शिक्षण-२).